सोप्या शब्दात

# पतसंस्थांसाठी नवा कायदा



महाराष्ट्र राज्यातील पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित राहून पतसंस्थांचा कारभार अधिक सुस्थितीत व गतिमान होण्यासाठी सध्याच्या सहकार कायद्यात बदल सुचविलेलेल आहेत. पतसंस्थांचा कारभार गुणात्मक होण्यासाठी **बँकींग रेग्युलेशन कायद्यातील** काही तरतुदी जशाच्या तशा स्विकारलेल्या आहेत. या सुधारीत नव्या सहकार कायद्यातील पतसंस्थांसाठी महत्वाच्या बाबी खालील प्रमाणे आहेत. :-

१. क्रियाशील सभासदत्व
२. पतसंस्थांनी कोणत्या प्रकारचा व्यवसाय करावा.
३. पतसंस्थांनी कोणत्या प्रकारचा व्यवसाय करू नये.
४. पतसंस्थांकडे असणाऱ्या स्थावर मालमत्तेची विल्हेवाट लावण्याची तरतुद.
५. २ तज्ञ व्यक्तींची संचालक म्हणून नियुक्ती.
६. ठेवींच्या २ टक्के इतकी रोख तरलता.
७. वैधानिक तरलता निधीची रक्कम २३ टक्के.
८. संचालक व त्यांच्या नातेवाईकांना कर्ज देण्यास बंदी.
९. पतसंस्थांसाठी नियामक मंडळाची स्थापना.
१०. आर्थिक अडचणीत आलेल्या पतसंस्थांना तरलता पुरवण्यासाठी स्थैर्य निधीची स्थापना.

महाराष्ट्र राज्यात २५ हजाराच्या दरम्यान असणाऱ्या नागरी / ग्रामीण बिगर शेती पतसंस्थांसाठी सहकार कायद्यात वरील विषयाला अनुषंगून बदल प्रस्तावित आहेत. पतसंस्थांची अफाट संख्या लक्षात घेता राज्यस्तरीय **नियामक मंडळाची निमिर्ती** हा या नव्या कायद्यातील मुख्य भाग आहे. मा. सहकार निबंधकांना या नियामक मंडळाशी सल्ला मसलत केल्याशिवाय पतसंस्थांच्या बाबतीत वरील विषयाच्या संदर्भात कुठलाही निर्णय घेता येणार नाही. हे नियामक मंडळ नागरी सहकारी बँकांप्रमाणे स्थापन केलेल्या **टास्क फोर्सच्या** धरतीवरच स्थापले जाणार आहे. त्यामुळे ह्या **नियामक मंडळावर राजकीय लोकांना स्थान नाही.** पतसंस्था, बँकीग व अर्थशास्त्र क्षेत्रातीलच लोक ठरलेल्या ढाच्यामध्ये या नियामक मंडळावर अध्यक्ष व सदस्य म्हणून ३ वर्षांसाठी कारभार करतील. थोडक्यात पतसंस्थांसाठी नियामक मंडळ हे प्रस्तावित नवीन कायद्यातील क्रांतीकारक पाऊल आहे.

सर्व तरतुदींचा थोडक्यात विस्तार व तपशील खालीलप्रमाणे :-

१. क्रियाशील सभासद म्हणजे ठेवीदार व कर्जदार असा राहणार आहे. ठेवीदार व कर्जदाराशिवाय इतरांचे मतदानाचे हक्क समाप्त होणार आहेत.

२. पतसंस्थांना सभासदांकडून ठेवी स्विकारणे व सभासदांना कर्जाचे वाटप करणे व सभासदांना सेफ डिपॉझीट लॉकर्सची सेवा पुरविणे एवढेच काम करता येणार आहे.

३. पतसंस्थांना नवीन कायद्याप्रमाणे हॉस्पीटल चालवणे, रस्त्याच्या डांबरीकरणाची कंत्राटे घेणे, टोलनाके चालविणे, शाळा चालविणे इत्यादी प्रकारचे व्यवसाय करता येणार नाहीत.

४. पतसंस्थेकडे उपलब्ध असलेली स्थावर मालमत्ता की जिचा व्यवसायासाठी काही उपयोग नाही अशा मालमत्तांची विल्हेवाट लावण्याची कालमर्यादा ७ वर्षापर्यंत प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

५. पतसंस्थांमध्ये २ तज्ञ व्यक्तींची नेमणूक करताना अकांऊटंन्सी, ऑडीट, बँकींग, फायनान्स, कॉमर्स, अर्थशास्त्र, टॅक्सेशन किंवा कायदा या क्षेत्रात किमान १० वर्षांचा अनुभव आवश्यक राहणार आहे. जर ३ महिन्यांच्या आत पतसंस्थांनी तज्ञ संचालकांच्या नेमणुका केल्या नाहीत तर मा. सहकार निबंधक ह्या नेमणुका करतील.

६. नागरी सहकारी बँकांना रोख तरलता ३ टक्क्यांपर्यंत ठेवावी लागते. परंतु नागरी सहकारी पतसंस्थांना ही रोख तरलता २ टक्क्यांपर्यंत ठेवण्याचे प्रस्तावित केले आहे. नियामक मंडळाच्या सल्यानुसार यात बदल होवू शकतो.

७. नागरी सहकारी बँकांना वैधानिक तरलता निधी २५ टक्के ठेवण्याची तरतुद आहे. परंतु पतसंस्थांना ही तरतुद २३ टक्क्यांपर्यंत प्रस्तााावित केली आहे. नियामक मंडळाच्या सल्यानुसार यात बदल होवू शकतो.

८. पतसंस्थांच्या संचालक व त्यांच्या नातेवाईकांना नागरी सहकारी बँकांप्रमाणे कर्ज घेण्यावर बंदी घालण्याचे प्रस्तावित केले आहे. परंतु ह्या संचालकांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या ठेवीवर मात्र कर्ज देण्याची तरतुद कायम राहणार आहे. तसेच संचालक व त्यांच्या नातेवाईकांच्या कंपन्यांनासुध्दा कर्ज देण्यास मज्जाव सुचविलेला आहे. शिवाय संचालकांच्या सध्याच्या कर्जाची परतफेड २ वर्षात करावयाची आहे. संचालक व नातेवाईकांच्या कर्जावर कुठल्याही प्रकारची सुट देता येणार नाही.

९. पतसंस्थांसाठीच्या प्रस्तावित कायद्यातील सर्वात महत्वाचा बदल म्हणजे **एका नियामक**

**मंडळाची स्थापना** ही होय. या नियामक मंडळात अध्यक्षांसह एकूण ४ सदस्य असणार आहेत. भारतीय रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांसाठी स्थापन केलेल्या टास्क फोर्सच्या धरतीवरच या नियामक मंडळाची स्थापना सुचविण्यात आलेली आहे. या नियामक मंडळात नेमण्यात येणारे सदस्य हे पतसंस्था, बँकींग, अर्थशास्त्र इत्यादी क्षेत्रातील किमान १५ वर्षांचा अनुभव असणारे असतील आणि **या सदस्यांची नेमणूक ही बिगर राजकीय असेल.** हे नियामक मंडळ पतसंस्थांच्या व्यवहारावर भविष्यात प्रभाव पाडील. यामुळे मा. सहकार निबंधक नियामक मंडळाशी सल्ला मसलत केल्याशिवाय पतसंस्थांच्या बाबतीत कुठलाही निर्णय घेवू शकणार नाही.

१०. पतसंस्थांच्या प्रस्तावित कायद्यातील **स्टॅबिलायजेशन फंड म्हणजे स्थैर्य निधीची स्थापना** हा क्रांतीकारक विचार आहे. प्रामणिकपणे कारभार करूनसुध्दा अडचणीत आलेल्या पतसंस्थांना तरलता पुरविण्यासाठी या फंडाचा उपयोग होणार आहे. राज्यातील सर्व पतसंस्थांना याचे सभासद व्हावे लागणार आहे. शासन या फंडात सुरवातीस १०० कोटी रूपये गुंतवणार आहे. व राज्यातील सर्व पतसंस्थांकडून ठेवीच्या प्रमाणात ठराविक दराने निधी जमा करेल. ह्याच स्थैर्य निधीमधून अडचणीतील पतसंस्थांना अत्यंत कमी व्याजदराने कर्जपुरवठा करील.

प्रस्तावित कायद्यातील अजून एक महत्वाची तरतुद म्हणजे पतसंस्थांच्या विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकारी यांना त्यांच्याकडे कायदेशीर तारण असलेली मालमत्ता थकीत **कर्जाच्या वसुलीसाठी कुठल्याही कोर्टाच्या आदेशाशिवाय ताब्यात घेवून तिची जाहीर लिलावाद्वारे विक्री करून थकीत रक्कम वसुलीचा देण्यात आलेला अधिकार होय.** केंद्र सरकारच्या **सेक्युटराजेशन कायद्यातील** तरतुदी सारखीच ही तरतुद आहे.

एकंदरीत पतसंस्थांच्या नवीन प्रस्तावित कायद्यातील ऐतिहासिक व सहकारामध्ये क्रांती करणारे खालील दोन निर्णय असणार आहेत.

**थकबाकीदार सभासदांना मतदानाचा हक्क नाकारणे व एका व्यक्तीस दुसऱ्या पतसंस्था किंवा बँकेवर संचालक म्हणून राहता न येणे हे होय.**

या प्रस्तावित कायद्यातील तरतुदी सहकार व प्रामुख्याने पतसंस्थांना मार्गदर्शक ठरू शकतो किंवा नाही हा आत्मचिंतनाचा भाग आहे. ज्यांची जशी वृत्ती व प्रवृत्ती आहे त्यांना हा प्रकार तशा प्रमाणात भावणार आहे. **सहकाराचा अर्थ आपल्या शिवाय कोणीही चांगले काम करू शकत नाही** असे ज्यांना ज्यांना वाटते त्यांचे बाबतीत हा प्रस्तावित बदल चिंतनीय ठरणार आहे. परंतु सहकाराला मात्र निश्चितपणे मार्गदर्शक ठरणार आहे याचे उत्तर काळच देईल.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार!!!**